## श्री. गौ. स. हांगे न्यायाधीश, कामगार न्यायालय, महाड, जि. रायगड, यांचेसमोर

**तक्रार (यु.एल.पी.) क्र. १०/२०२४**
**सीएनआर नं. एमएचएलसी०६००००५१२०२४**

**श्री. हेमंत रामदास मसराम (चालक)**
वय -४५ वर्षे
रा. मुरूड जि. रायगड

**तक्रारदार...**

**V/s.**

**1. विभागीय वाहतूक अधीक्षक**
M. S. R. T. C. रायगड विभाग
रामवाडी, ता.- पेण, जि.- रायगड.

**2. M. S. R. T. C.**
द्वारे, व्यवस्थापक
रामवाडी, पेण, जि. रायगड.

**जाबदार...**

**पिठासन अधिकारी :- श्री. गौ. स. हांगे**

**विधिज्ञ :- श्री. विजय मेहता : तक्रारदाराकरीता**
**श्रीमती शुभदा मोकल : जाबदाराकरीता**

## भाग १ वर आदेश

(दि. २०/०८/२०२५)

जाबदारांनी दि. ०१/०७/२०२४ रोजीची तक्रारदारावर त्यांस रा. प. सेवेतून बडतर्फ का करू नये याचा खुलासा मागविणारी कारणे दाखवा नोटीस बजावली म्हणून त्याने प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे.

२. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार जाबदारांनी त्याच्यावर ठेवलेले आरोप

खालील प्रमाणे-

१.१ तक्रारदार हा रा. प. मुरूड आगारात चालक म्हणून कार्यरत आहे. त्यास चालक अपघात उजळणी प्रशिक्षणाकरीता दि. ०५/०२/२०२४ ते १४/०२/२०२४ या कालावधीकरीता रा. प. विभागीय कार्यालय येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. दि. १४/०२/२०२४ रोजी तक्रारदार चालक अपघात उजळणी प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी हजर असताना त्याने मद्य प्राशन केल्याचे अहवालकर्ते यांना हजेरी घेत असताना निदर्शनास आले. त्यामुळे तक्रारदार याची रा. प. विभागीय कार्यालयातील अल्कोहोल चाचणी मशीन द्वारे तीन वेळेस अल्कोहोल तपासणी करण्यात आली. त्या तपासणी मध्ये तक्रारदार याच्या शरीरात १११.५ मि. ली गॅम/१०० मि. लि., १०१.९ मि. ली गॅम/१०० मि. ली.,व १०३.७ मि. ली. ग्रम/१०० मि. ली. अश्या प्रमाणात अल्कोहोल असल्याचे निदर्शनास आले. तक्रारदाराचे कृत्य हे चालकासारख्या महत्वाच्या कामगिरीसाठी प्रवाशी जिवीताचा सुरक्षिततेचा विचार करीता धोकादायक असून त्यास ते जबाबदार आहेत.

३. तक्रारदाराच्या कथनानुसार दि. १४/०२/२०२४ रोजी त्याने कुठल्याही प्रकारचे मद्य प्राशन केलेले नव्हते. त्याला दम्याचा खोकल्याचा त्रास आहे तसेच रक्तदाबाच्या त्रासाने त्याचे पाय सुजले जातात. त्याने वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे तपासणी केली असता त्यांनी त्यास खोकल्याचे औषध टस्क्यू डीएक्स दिलेले होते. तसेच पाय सुजण्यासाठी वार्फ एक या गोळ्या दिवसातून दोनवेळा घेण्यास सांगितल्याने त्याने त्यांच्या सल्ल्यानुसार सकाळी औषध व गोळ्या सेवन केल्या होत्या. ही बाब त्याने उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी त्याचे म्हणणे एकूण घेतले नाही. तत्पुर्वी दि. १३/०२/२०२४ रोजी मध्यरात्री कामगिरीवरून आल्यानंतर त्याने मद्य प्राशन केलेले होते. त्याच्या कथनानुसार त्याने कुठल्याही प्रकारचे गैरशिस्त पणाचे कृत्य केलेले नाही व रा. प. महामंडळाची हानी केलेली नाही. तसेच कोणत्याही प्रशासकीय आदेशाचा भंग केलेला नाही.

४. तक्रारदाराच्या कथनानुसार जाबदार यांनी त्याच्या विरूध्द कलम १०,११,२२,४२ अन्वये आरोपपत्र दाखल केलेले आहेत व त्याने दि. ०७/०३/२०२४ रोजी आरोपपत्रातील आरोप नाकारून त्याचे म्हणणे सादर केलेले आहे. तक्रारदाराच्या कथनानुसार जाबदार यांनी वर नमुद केलेल्या बाबींचा विचार न करता त्यास दोषी धरलेले आहे. त्याची आजपर्यंतची सेवा ही विना तक्रारी व निष्कलंक झालेली आहे. त्यामुळे त्याच्यावर ठेवण्यात आलेले आरोप हे केवळ त्याला सेवेतून बडतर्फ करण्यासाठी केलेले आहेत.

५. तक्रारदाराच्या कथनानुसार त्याच्यावरील आरोप खोटे व चुकीचे असून त्याला कोणतीही योग्य संधी न देता त्याची चौकशी पूर्ण केली आहे. चौकशी अधिका-याने त्याला त्रास देण्यासाठी सूड बुध्दीने चुकीचा निष्कर्ष काढलेला आहे. त्याच्या कथनानुसार चौकशी अधिकारी यांनी इतर साक्षीदारांना तपासले नाही. तसेच त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करून तक्रारदाराला दोषी ठरवण्यात आले आहे. त्यामुळे चौकशी अधिकारी यांनी केलेली चौकशी ही कायद्याच्या तत्वांना अनुसरून नाही व काढलेला निष्कर्ष उपलब्ध पुराव्याचा गैरअर्थ काढून प्रतिकूल काढलेला आहे.

६. जाबदार यांनी निशाणी क्र. सी-३ कडे त्यांचे म्हणणे व लेखी कैफीयत दाखल कलेली आहे. त्यांनी त्यांच्या कथनांमध्ये तक्रारदार हा दि. ०५/०२/२०२४ ते १४/०२/२०२४ रोजी चालक अपघात उजळणी प्रशिक्षणाच्या शेवटच्या हजर होताना मद्य प्राशन केल्याचे अहवालकर्ते यांना तक्रारदाराची हजेरी घेत असताना निदर्शनास आले. त्यानंतर त्याची रा. प. विभागीय कार्यालयातील अल्कोहोल चाचणी मशीन द्वारे अल्कोहोल चाचणी केली असता त्याच्या शरीरामध्ये १११.५ मि. ली गॅम/१०० मि. लि., १०१.९ मि. ली गॅम/१०० मि. ली.,व १०३.७ मि. ली. ग्रम/१०० मि. ली. अश्या प्रमाणात अल्कोहोल असल्याचे निदर्शनास आले.

७. तक्रारदाराचे कृत्य निष्काळजीपणाचे, गैरशिस्तीचे, बेजबाबदारपणाचे,

हयगयीचे असून तक्रारदारावर शिस्त व अपिल कार्य पध्दतीचे अनुसूची अ कलम १०,११,२२,४५ अन्वये आरोप दाखल करण्यात आलेले आहेत व त्यानुसार त्यास दि. २१/०२/२०२४ रोजी आरोप पत्र दिलेले आहे. त्याने त्या आरोप पत्रास उत्तर दिले असून आरोप नाकारून युनियन प्रतिनीधी समवेत समक्ष सुनावणी मागणी केली. त्याप्रमाणे दि. २९/०४/२०२४ रोजी समक्ष सुनावणी नेमली. चौकशी कामी प्रतिवृत्तकार यांनी त्यांचा अहवाल सादर केला व तो त्यांचा जबाब समजावा असे त्यांनी सांगितले. चौकशी अधिका-याने प्रश्नोत्तर पध्दतीने काही प्रश्न त्यांना विचारले. तक्रारदाराचा प्रतिनिधी म्हणून त्याच्या युनियन प्रतिनिधी ने प्रतिवृत्तकाराचा उलट तपास घेतला. त्यानंतर चौकशी अधिका-याने तक्रारदार याच्याकडे चौकशी करून त्यास काही सांगावयाचे आहे का असे विचारले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्याचे म्हणणे मांडले व अपराधातून मुक्त करावे अशी विनंती केली.

८. जाबदारांच्या कथनानुसार तक्रारदाराविरूध्द चौकशीचे काम योग्य व न्यायबुध्दीने, प्रामाणिकपणे चालविण्यात आले. तक्रारदारास चौकशीकामी, त्याची बाजू मांडण्यासाठी योग्य व पुरेशी संधी दिली होती. चौकशी अधिका-याने काढलेले निष्कर्ष चुकीचे नाहीत. त्यास सुचविण्यात आलेली शिक्षा ही योग्य व वाजवी आहे. काढलेले निष्कर्ष हे नैसर्गिक न्याय सद्सदविवेक बुध्दीने, कागदोपत्री व तोंडी पुरावा यांचे गुणग्रहण करून काढलेले आहेत. त्यास सुधारण्याची संधी देवूनही त्याच्या वागण्यात फरक पडत नाही.

९. पुढे त्यांच्या कथनानुसार, यदाकदाचित झालेली चौकशी ही योग्य, न्याय, प्रामाणिकपणे झालेली नाही व चौकशी अधिका-याने काढलेले निष्कर्ष चुकीचे आहेत असे अनुमान आल्यास त्यांना तक्रारदाराविरूध्द असलेले आरोप न्यायालयात शाबीत करण्यासाठी लेखी व तोंडी पुरावा देण्याची संधी मिळावी अशी मागणी केली आहे. पुढे त्याच्या कथनानुसार, त्यांनी अनुचित प्रथेचा अवलंब केलेला नाही. तक्रारदार याच्या नोकरीचा कालखंड निष्कलंक नाही. तक्रारदार ही परिवहन मंडळास लागलेली कीड आहे.

ती वेळेतच बाहेर काढून टाकणे गरजेचे आहे. तक्रारदार, जनता व परिवहन मंडळ यांचा तुलनात्मक विचार करता एका व्यक्तीसाठी जनतेस हाल अपेष्टा देणे योग्य व न्यायाने नाही. सबब चौकशी अधिकारी यांनी केलेली चौकशी योग्य व नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरून आहे.

१०. दोन्ही बाजूंच्या परस्पराविरोधी कथनांचा विचार करता पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यांचा निष्कर्ष फी खालील कारणास्तव देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराविरुध्द करण्यात आलेली चौकशी योग्य व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून करण्यात आली आहे काय ? | **"होय"** |
| २. | चौकशी अधिकारी यांचे निष्कर्ष प्रतिकूल आहे काय ? | **"नाही"** |
| 3. | आदेश काय ? | **"अंतिम आदेशाप्रमाणे"** |

## <u>कारणमिमांसा</u>

११. तक्रारीमध्ये दाखल असणा-या कागदपत्रांच्या अनुषंगाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतला.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ (एकत्रितपणे) :</u>**

१२. तक्रारदार याने या अर्जाकामी अभिलेखावर खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेत -

१. दि. २१/०२/२०२४ रोजी तक्रारदार यास दिलेले आरोपपत्र

२. आगार व्यवस्थापक, मुरूड यांनी विभाग नियंत्रक रायगड यांना पाठविलेला घटनेचा अहवाल

३. विभागीय वाहतूक अधिकारी, यांनी दि. ०१/०७/२०२४ रोजी तक्रारदार यांस दिलेल्या नोटीसीचे प्रत

४. घटनेच्या वृत्तांकाची प्रत

५. विभागीय वाहतुक अधिकारी, यांनी दाखल केलेला चौकशी अहवाल
६. चौकशीची कागदपत्रे

१३. तक्रारदार यांनी प्रस्तुतची तक्रार त्यांस सामनेवाला यांनी बडतर्फची नोटीस पाठविल्यामुळे दाखल केलेली आहे. तक्रारदार दि. ०५/०२/२०२४ ते १०/०२/२०२४ रोजी या कालावधीत तो प्रशिक्षणाकरीता रा. प. विभागीय कार्यालय येथे हजर दि. १४/०२/२०२४ रोजी मद्य प्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याची अल्कोहोल चाचणी केली असता त्याच्या शरीरामध्ये अल्कोहोल असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याच्या विरूध्द वर नमुद केलेले आरोपपत्र दाखल केले आहे.

१४. तक्रारदार याने दाखल केलेल्या समक्ष सुनावणी कागदपत्रांचे बारकाइने अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवृत्तकार यांनी त्यांच्या जबाबामध्ये तक्रारदार याच्या प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी हजेरी घेत असताना तोंडाचा आंबट वास येत होता. त्यामुळे त्याची अल्कोहोल चाचणी करण्यात आली व त्या चाचणीमध्ये मशीनची नळी तोंडामध्ये धरून तक्रारदार यांस फुंकर मारण्यास सांगितले होते व त्यामध्ये त्याच्या शरीरात अल्कोहोल मिळाल्याचे कथन केलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी आरोपीला प्रश्न क्र. ३१ मध्ये त्यास काही सांगावयचे आहे का, अशी विचारणा केली असता त्याने डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या औषधामुळे तोंडाला नेहमीपेक्षा वेगळा वास येत असल्याचे कबूल केले आहे. तसेच त्याने त्याची अल्कोहोल चाचणी मशीन द्वारे केल्याचे कबूल केले आहे ही बाब निश्चितच ग्राह्य धरणे आवश्यक आहे.

१५. तक्रारदार याने त्याच्या तक्रारीमध्ये त्याने दि. १३/०२/२०२४ च्या मध्यरात्री वैयक्तीक कारणांसाठी मद्य प्राशन केल्याचे कबूल केले आहे. एका बाजूने तो डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या औषधे घेतल्यामूळे तोंडाचा आंबट वास येत असल्याचा सांगतो, तर दुसऱ्या बाजूने त्याने आदल्या रात्री मद्य प्राशन केल्याचे कथन करतो. याठिकाणी त्याने त्याच्या तोंडाला आंबट वास येत असल्याबाबतची दोन वेगवेगळी कारणे दिल्याचे दिसून येत आहे. चौकशी कागदपत्रांमध्ये अल्कोहोल चाचणीचे दि.

१४/०२/२०२४ रोजी चे अहवाल दाखल केलेले आहे, त्यामध्ये तक्रारदार याने अल्कोहोल घेतल्याचे निदर्शनास येत आहे. त्याच्या कथनानुसार त्याने कोणतेही गैरशिस्तीचे कृत्य केलेले नाही. परंतु तक्रारदार हा दि. ०५/०२/२०२४ ते १४/०२/२०२४ या कालावधी प्रशिक्षणासाठी रा. प. विभागीय कार्यालय येथे गेलेला आहे याचा अर्थ त्या कालावधीमध्ये तो प्रशिक्षणार्थी असून सकाळी अथवा संध्याकाळी त्याने नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. मध्य रात्री मद्य प्राशन केले याचा अर्थ तो प्रशिक्षण कालवधी मध्ये नाही असे होत नाही.

१६. चौकशी अधिकारी यांनी केलेल्या चौकशी मध्ये तक्रारदार याने मद्य प्राशन केले नसून औषधांमुळे वास येत असल्याचे कथन केले आहे, परंतु दि. १४/०२/२०२४ या दिवशी केलेल्या अल्कोहोल चाचणी मध्ये त्याने मद्य प्राशन केल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदरचे कृत्य ते नक्कीच गैरशिस्तीचे, बेजाबाबदारपणाचे व निष्काळजीपणाचे असून तक्रारदार चालक सारख्या महत्वाच्या कामगिरीसाठी धोका दायक असून त्याचे गंभीर परिणाम होण्याचे शक्यता नाकारता येत नाही. त्याने चौकशी दरम्यान तो घेत असलेल्या औषधांची कागदपत्रे सादर करू शकला नाही. त्यामुळे त्याने मद्य प्राशन केले नाही व औषधांमुळे तोंडाचा वास येत होता असे ग्राह्य धरणे उचित होणार नाही.

१७. चौकशी कागदपत्रांचे बारकाइने अवलोकन केले असता तक्रारदार याने कामगिरीवर असताना मद्य प्राशन केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. तक्रारदाराच्या वकीलांनी अल्कोहोल तपासणीचे मशीन वापरण्यात नसल्यामुळे त्याच्या अहवालावर विश्वास ठेवणे योग्य होणार नाही, असा युक्तीवाद केला आहे. परंतु तक्रारदार याची एकदा चाचणी केलेली नसून तीन वेळा चाचणी केलेली आहे व तिन्ही वेळेस त्याच्या रक्ता मध्ये अल्कोहोल आढळल्याचे दिसून येत आहे. तसेच स्वत: तक्रारदार त्याच्या मुख्य तक्रारीमध्ये आदल्या रात्री मद्य प्राशन केल्याचे कबूल करीत आहे. त्यामुळे अल्कोहोल चाचणी वापरात नसल्यामुळे चुकीचे निष्कर्ष आले, असे म्हणणे योग्य होणार नाही. तक्रारदाराने केलेले कृत्य नक्कीच गंभीर असून चालक या पदासाठी आवश्यक असणाऱ्या

पात्रतेच्या विरोधात आहे. जर तक्रारदाराच्या या कृत्यास संरक्षण दिले तर त्याची गंभीरता त्याच्या लक्षात येणार नाही व भविष्यामध्ये तशाच प्रकारचे कृत्य करून त्याच्या हातून गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. चौकशी अधिकारी यांनी उपलब्ध पुराव्याचा उहापोह करून तक्रारदार याच्याविरूध्द दोषी असण्याचा काढलेला निष्कर्ष बरोबर आहे. चौकशी अधिकारी यांनी तक्रारदार यास पुरावा सादर करण्याची तसेच साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची पूर्ण संधी दिलेली आहे. चौकशी दरम्यान अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून तक्रारदार दोषी असल्याचे दिसून येते. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व त्याप्रमाणे खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराविरुध्द झालेली चौकशी ही योग्य व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून झालेली आहे, असे जाहीर करण्यात येते.

२. चौकशी अधिकारी यांचे निष्कर्ष प्रतिकूल नाहीत असे ठरविण्यात येते.

HANGE GAURAV SADASHIV

Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2025.08.28 14:31:25 +0530

**(गौ. स. हांगे)**
**न्यायाधीश**
**कामगार न्यायालय महाड**

महाड.
दिनांक. २०/०८/२०२५